**नळ पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रके व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता देतांना नियमाप्रमाणे देय असलेली भाववाढ विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देणे.**

-----------------------------------

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : ग्रापापु-१०९६/प्र.क्र.१२५९/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : १९ मे, १९९८.**

**पहावे :-** १) शासन निर्णय वित्त विभाग,क्र. विअप्र-१०९२/प्र.क्र. ११३/९२/विनियम, दिनांक १ जून, १९९२.
२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,क्र.ग्रापापु-१०९६/प्र.क्र. १२५६/ पापु-०७, दिनांक ११ ऑक्टोबर, १९९६.

**प्रस्तावना :-** वित्त विभागाच्या संदर्भात नमूद केलेल्या दिनांक १ जून ११९२ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील भाग पहिला उपविभाग-तीन मधील अनुक्रमांक ५ येथील नियम २७(२) अन्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबधित प्रशासकीय विभागांना योजनेतील दरडोई, पाणी पुरवठयाचे प्रमाण तसेच योजनेच्या दरडोई खर्चाचे प्रमाण जेथे प्रमाणके विहित करण्यात आली असतील तेथे त्या प्रमाणकानुसार असल्यास व योजना त्या वर्षाच्या वार्षिक कृती आराखडयात समाविष्ट असल्यास प्रदान करण्यात आले आहेत. सदर अधिकार काही प्रमाणात संदर्भात नमूद केलेल्या दिनांक ११ ऑक्टोबर,१९९६ च्या शासन निर्णयान्वये क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. मात्र प्रशासकीय मान्यता देताना अंदाजपत्रकामध्ये प्रति वर्षी होणारी भाववाढ विचारात घेण्यात येत नाही. मात्र योजनेला प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर पुढील कालावधीत भाववाढ होत असल्यामुळे योजनेची किंमत वाढते व त्यास पुनः सुधारीत प्रशासकीय मान्यता द्यावी लागते. यास्तव अशी भाववाढ मूळ प्रशासकीय मान्यता देते वेळीच विचारांत घेऊन योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंबंधात शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :-** वित्त विभागाच्या संदर्भात नमूद केलेल्या दिनांक १ जून १९९२ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण नळ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास असलेले अधिकार व शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रं. ग्रापापु १०९६/ प्र.क्रं. १२५६/पापु-०७, दिनांक ११ ऑक्टोबर,९६ अन्वये पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रक व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार सक्षम क्षेत्रीय प्राधिकाऱ्यांना

त्यात नमूद केलेल्या वित्तीय अधिकार मर्यादेत प्रदान करण्यात आलेले आहेत, त्या वित्तीय मर्यादा कायम ठेवून योजना मंजूर करताना प्रति वर्षी होणारी भाववाढ विचारांत घेऊन अशा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार खालील अटींच्या अधीन राहून त्या त्या स्तरावर प्रदान करण्यात येत आहेत.

१) योजना किती कालावधीत पूर्ण होईल याचे टप्पे ठरविण्यात यावे व त्या आधारे दर वर्षी योजनेला किती खर्च होईल याची टक्केवारी ठरविण्यात येईल.

२) योजना मंजूर करताना भविष्यात होणारी भाववाढ लक्षात घेऊन प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी. त्यासाठी भाववाढीमुळे होणारी दरवाढ ही प्रती वर्षी ७% इतकी धरण्यात यावी.

३) अशाप्रकारे भाववाढ लक्षांत घेऊन योजनेस प्रशासकीय मंजूरी दिल्यानंतर त्या योजनेच्या निविदा काढताना मात्र त्यामध्ये भाववाढीच्या रकमेचा अंतर्भाव करण्यात येऊ नये तर भाववाढी पोटी देण्यात आलेली वाढ वगळून योजनेच्या निविदा काढण्यात याव्यात.

प्रस्तुतचे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संमतीने त्या विभागाच्या संदर्भ क्रमांक विनियम २५२/९८, दिनांक १३.५.९८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(सु. ल. तिडके )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे स्वीय सहाय्यक.
२. विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर
७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई.
९. वित्त विभाग, विनियम, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. पाणी पुरवठा विभागातील सह सचिव, सर्व उप सचिव, सर्व कार्यासन अधिकारी.